लेखक : श्रीकांत जोशी

मी प्रेम विवाह का केला (नाही) ?

तसं सातवी आठवीत असतांनाच मी नक्की केलं होतं की करायचा तर प्रेमविवाहच. या निर्धाराला "नाही तर .... " हा उत्तरार्ध नव्हताच. करायचा म्हणजे करायचाच. या विषयाची गायडंही बाजारात भरपूर उपलब्ध होती. आजच्यासारखी लिखित स्वरूपात नाही बरंका ! निरनिराळ्या थेटरात त्याची पारायणं चालत असायची. राजकपूर, राजेंद्रकुमार, देवआनंद, धर्मेंद्र वगैरे वगैरे कितीतरी शिक्षक असत. चाटे, पी. जोग, फाडफाड इंग्लिश या सर्वांपेक्षा यांचा विद्यार्थीवर्ग फार मोठा असे. विश्वजीत, प्रदीपकुमार, भारतभूषण इत्यादी टुकार दर्जाचे शिक्षकही असत. त्यांच्या फक्त कविता वाचनाच्या तासाला आम्ही जात असू. त्यामुळे वरील निश्चय दरवेळी पक्का होत होता. फावल्या वेळात थोडेफार प्लॅनिंगही करून ठेवले होते. बंड गार्डनवर अल्प प्रमाणात बगीचा आहे. गर्दीही तशी कमी असते आणि असतात ते तिकडचे कॅम्प बीम्प मधले असतात. त्यामुळे ओळखीचं कोणी असण्याची शक्यता फारंच कमी. नाहीतर संभाजी उद्यानामागची नदीकडेची वाट अगदी आयडियल. फस्क्लास झुडपं वगैरे आहेत. ठीकठाक उंचीचीच आहेत. चार दोन वेळा त्याच्या अवतीभवती नागमोडी पळायची रंगीत तालीमही केली. अशा तालमीच्या वेळी कधीमधी गावात आमच्या जवळपास रहाणारे दादा, काका वगैरेही एखाद्या झुडपाच्या शक्य तेवढे अंग चोरून बसलेले आढळत. बरोबर कोणी अनोळखी ताई असे. थंडीचे दिवस असले तर दोघे जरा जवळजवळ बसत आणि उन्हाळ्यात इतरांच्या वाटेत यायला नको म्हणून तसे बसत. त्यांना जर ओळख दिली तर दुसऱ्या दिवशी शाळेत जातांना मला ते चॉकलेट देत. या आमिषामुळे पुढेपुढे अनोळखी लोकांकडे बघूनही मी स्मित करायला लागल्यावर मात्र ते अंगावर येत. मी मात्र मनातून त्या त्या माणसाच्या जागी स्वतःला बघत असे. पण एक मात्र खरं. इतक्या वर्षात कोणीही बागेत पळापळ करत गाणी म्हणतांना आढळला नाही. ती उणीव मी भरून काढणार होतो. पणजीत सचिवालयाकडून मीरामरकडे जातांना मांडवी नदीला समांतर एक उत्तमशी बाग मी हेरून देखील ठेवली होती. सामान्य वेगाने तिथल्या झाडांमधून पळतांना चार साडेचार मिनिटे लागायची. म्हणजे जरा जोराने धावावे लागेल ही खूणगाठही मनोमन बांधून ठेवली होती. पण गाणे म्हणत म्हणत पळायच्या कामात दोन एक मिनिटात धाप लागल्याने आणि निम्याहून जास्त बाग पार करायची राहिल्याने मी जागीच बसलो. बहुधा कुणीतरी निरुद्योगी उनाड मुलगा वेळ घालवायला दुपारभर इथे झोपणार अशी शंका इथल्या रखवालदाराला आल्याने त्याने मला हाकललेलेही चांगले आठवतंय.

असो. तर प्रेमविवाह करायचा हे नक्की. त्यासाठी आणखीही एक व्यक्ती लागेल ती कुठून मिळवायची वगैरे काही बिनमहत्वाचे किंवा गौण सदरातले प्रश्नही होते. ते तात्पुरते पार्क करून ठेवले होते. शिवाय आमची शाळा फक्त मुलांची असल्याने हा प्रश्न सोडवण्यासाठी जरा बाहेरही लक्ष घालणे जरूरीचे होते. त्यामुळे सध्यातरी मी त्याला फार महत्वाचा मानत नव्हतो. माझ्या बाजूने तयारी जवळ जवळ पूर्ण होत आली होती. सात-आठ गाणीही (एखाद दुसरे कडवे का होईना.) बसली होती. पण मूळ प्रश्न जो दुय्यम समजला होता तोच फार महत्वाचा आहे हे कळेकळेपर्यंत शाळेतले ते सोनेरी दिवस संपले सुद्धा. कॉलेजात तर अनेक अनुभवी आणि ज्ञानी लोक होते. पण त्यांना शिक्षकवर्गाकडून तंबी मिळतांना पाहून किंवा विरुद्ध पार्टीच्या भावाबिवांकडून मार खातांना पाहून पावलं जरा जपूनच टाकायची ठरविली. कोणी हितचिंतक "ती अमुकतमुक तुझ्याकडे बघून हसते बरका" असं सांगताच दुसरा विघ्नसंतोषी "पण तिचा भाऊ शाहू कॉलेजात आहे आणि गेल्या वर्षीचा साठ किलो गटातला बॉक्सिंग चॅम्पियन आहे" हे हळूच सांगून हवा काढायचा. या प्रकरणातून माघार जरी घेतली (खरं तर प्रकरणाला हातच घातला नाही) तरी माझ्या निश्चयापासून तसूभरही मागे फिरलो नाही
.

पण तसे घडायचे नव्हते. वडिलांकडून निरोपावर निरोप यायला लागले की आता पैसे पाठविणे शक्य होणार नाही. स्वतःच काहीतरी हालचाल करायची बघा. सुदैवाने कमिन्समधे स्वतःबद्दलच्या मारलेल्या लंब्या चौड्या बाता पचल्या आणि मी चिकटलो. सकाळ संध्याकाळ पाच पाच किलो मीटर सायकल मारून घरी गेल्यावर स्वतः कॉफी करायचंही त्राण राहायचं नाही. रात्री खाणावळीतले तुकडे मोडतांना जुना निश्चय ढवळून वर यायचा. मग दोन तीन दिवस लक्ष्मी रोड, जंगली महाराज रोड वगैरेवर पहाणी व्हायची. क्वचित एखादी जुनी वर्गभगिनी रस्त्यात दिसायची. शक्यतो टाळायचा प्रयत्न करायची. नाहीच जमलं तर "मामाला हॅलो कर बंड्या किंवा चिंगे" असं कडेवरच्या किंवा बोटाला धरलेल्याला सांगून आमचा पोपट करायची.

एकदा मात्र सॉलिड गोची झाली. आई नुकतीच परत पणजीला गेली होती. फार दिवसांनी पारतंत्र्यातून सुटल्याने आमच्या काही मित्रांनी आमच्या घरी मुक्काम (परत) हलवला होता. घराचे दृश्य अशावेळी फार नामांकित असे. रात्री परत घालायच्या असल्याने सकाळी उठल्यावर अंथरूण पांघरूण तसेच ठेवायचो. ग्लास, कप बशा, भांडी, पातेली वगैरे लागतील त्या प्रमाणे लागतील तेंव्हा आणि लागतील तेव्हढीच मोरीतून आपापली धुवून घेण्याची आमची शिस्त होती. म्हणजे स्वच्छतेच्या बाबतीत तडजोड नको. धुतलेले कपडे - असतील तर - दांड्या, खुंट्या, पलंग, खुर्च्या, टेबलं, खिडकी इथे जिथे जागा मिळेल तिथे वाळत टाकलेले असत. अर्थात इतक्या सर्व जागांवर कपडे रविवारीच असत म्हणा. पण एकूण एखाद्या ब्रह्मचाऱ्याची आदर्श मठी होती. एका वेळी गेला बाजार चार पाच तरी ब्रह्मचाऱ्यांचं वास्तव्य असे तिथे.

तर अशाच एका संध्याकाळच्या रम्य वेळी दाराची कडी खडखडली. दाराजवळच्या मित्राकडे मी त्रासिक नजरेने पाहताच तो त्यापेक्षा त्रासिक नजर करून "कोण तडफडलंय आत्ता ?" असं पुटपुटत उठला. मी घरमालक असल्याने बिलकूल हललो नाही. दोनच मिनिटात मुलांची धावाधाव सुरु झालेली जाणवली. अंगावरचे टॉवेल, लुंग्या काढून भराभर पँटी चढवून पोरं पळाली सुद्धा. आयला, आई बाबा आले की काय ? मीही दबकत दबकत दाराशी गेलो. दाराशी सुरेश आणि अनील नांवाच्या माझ्या जेष्ठ मित्रांच्या आया उभ्या. आं ! यांनी माझ्याकडे काय काम काढले ? एवढा विचार करून त्यांना "आत या" म्हणेपर्यंत त्यांच्यामागे एक सुबक ठेंगणी उत्तम खाशी मुलगी दिसली. गेली दहा पंधरा वर्ष मनात मांडे खात असलेल्या माझी आता मात्र बोबडी वळली. या दोघींना आत येण्यासाठी परवानगीची गरज वाटलीच नव्हती. मला ढकलून केंव्हाच त्या आत प्रविष्ट झाल्या होत्या. "मेल्या झोपला बिपला होतास की काय ?"
"छे काकू, ते मित्र आले होते नां ? आम्ही सहा जण पास्तीनदोन खेळत होतो. म्हणून गाद्या घातल्या होत्या."
"ते मरू दे. आई परत कधी येणार आहे ? काम आहे तिच्याकडे. आणि हिला ओळखलीस ना ? माझ्या सुनबाईची - अनीलच्या बायकोची धाकटी बहीण. तुझ्या आईला दाखवायचीय."
"आईला ? कशाला ?"
"तुझ्यासाठी बावळटा."
"मग आईला कशाला ? मी आहे ना .... "
"तुला काय कळतंय गाढवा. आई केंव्हा येणार आहे बोल."
"गेल्या आठवड्यात तर गेलीय. मीच डिसेंबरात जाईन. काही सांगायचंय का ?"
"डिसेंबरात ? काही नको. मीच पत्र धाडते."

सांगायचा मुद्दा काय तर मित्राच्या मेहुणीला "दाखवायला" आणलं होतं. माझ्या सगळ्या बेतांवर पाणी टाकणार काय ? नो नाय नेव्हर. आजिबात फसायचं नाही. चहा-पोहे पद्धतीच्या विरुद्ध बंड करायचंय ना ? मग या जाळ्यात फसायचं नाही म्हणजे नाही.

"तुम्ही सारसबागेत नेहमी जाता नां ?" सुबक ठेंगणी.
"हो."
"पाहिलंय बऱ्याचदा. काळ्या फटफटीवर. समोरच दादाच्या मित्राचं सी.ए.चं ऑफिस आहे. दुपारी जाते मी तिथे. पाचला सुटते आणि बालभवनाच्या समोरच्या स्टॉपवर सहकारनगरच्या बससाठी जाते."
"बर मग ?"
"काही नाही. उगाच आपलं ...."
मला काय कळत नाही काय लुच्चे ? एवढी डीटेलवार माहिती कशासाठी हे न कळण्याइतका मी लेचापेचा समजलीस काय दुष्टे ? पण मी बधायचा बरं का ? दुसऱ्या दिवशी नेमका कंपनीतून लवकर निघालो. घरची कंपनी अजून उगवली नसल्याने काय करावं या विचारात असतांनाच मी बालभवनच्या बस स्टॉपपाशी गाडी लावून उभा असल्याचे आढळले. इकडे कसा आलो काही सुधरेना. तेवढ्यात तिकडून सुबक ठेंगणी येतांना दिसलीच. मीही काही मॅनर्स सोडले नसल्याने दात काढले. हे सर्व अपेक्षित असल्याच्या थाटात तिने मागच्या सीटवर बसून "चल" या एका शब्दावर माझा पतंग काटला. गाडीवरून जातांना "दमले बाई, आयती कॉफी मिळाली तर ...." असा डायलॉग आल्याने वाटेत थांबणं आलं.
"बरं, तुमचं काय मत आहे माझ्याबद्दल ?" या प्रश्नाला मी त्या सर्वसाक्षी ईश्वराला आणि माझ्या दृढनिश्चयाला स्मरून खोटं उत्तर दिलं की आमच्या घरच्यांना पत्रिका बित्रिका सगळे सोपस्कार करायचेत. तेंव्हा माझ्यावर अवलंबून राहू नका.
"हात्तीच्या, माहित होतंच. तुमची पत्रिका केंव्हाच मिळालीय आम्हाला. त्याबरहुकूम माझी बनवायला दिलीय आमच्या गुरुजींना."
झालं. माझ्या भात्यातले सर्व बाण खलास. पुढची कथा फारशी रोमहर्षक नाही. सहा महिन्यांनी घरी गेलो आणि "एका मुलीशी जमलंय आणि आम्हाला लग्न करायचंय. तर तेवढा विरोध करा म्हणजे माझा निश्चय तडीला जाईल" या उद्गारांवर घरच्यांनी तरी मला सहाय्य करावं की नाही ? छे.
"हो माहित्ये ना. सुरेशच्या आईचं पत्र केंव्हाच आलंय. त्या पोरीला चांगलीच ओळखते मी. मीच त्यांच्याकडे होकार कळवला होता. तुला कळवू कळवू म्हटलं. राहूनच गेलं मेलं. जाऊदे, छानच आहे पोर."

कळली माझी रडकथा ? आता कळलं नां माझी बायको सर्वांना नाक वर करून का सांगते की आमचं ऍरेंज्ड लव्ह मॅरेज आहे म्हणून ?